ऑगस्ट २००८

# मायबाप सरकार जनतेसाठी असावं लागतं

भारत देशाच्या लोकशाहीचा अर्थ सर्वांना माहित आहे. लोकांनी, लोकांसाठी अस्तित्वात आणलेली प्रक्रिया म्हणजेच लोकशाही. या लोकशाहीचे मुल्यमापन देशातील सर्वांसाठी समानतेवर आधारित आहे. एकास एक न्याय व दुसऱ्याला दुसरा न्याय असे भारताच्या संविधानामध्ये अभिप्रेत नाही. राज्यकर्त्यांनी या संविधानावर पुर्णपणे अंमल करणे ही कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे.

परंतु महाराष्ट्र राज्यात बऱ्याच स्तरावर या संविधानाचा केवळ अपमान केला गेला नाही तर, अत्यंत बेजबाबदारीने व सर्वसामान्य जनतेचा आर्थिक कणा पुर्णपणे मोडल्याचे चित्र दिवसेंदिवस वेगाने स्पष्ट होत आहे. बिचारी जनता हे निमूटपणे दुर्बलतेपोटी सहन करीत आहे. त्याची अनेक उदाहरणे हळूहळू दृष्टीक्षेपात येत आहेत.

महाराष्ट्रातील सहकार हा देशातील सहकाराच्या तुलनेने आघाडीवर आहे. राज्यातील हा सहकार, ज्या सहकाराने, शतक पुर्ण केले त्याला मान खाली जाईल अशा पध्दतीने करून ठेवला आहे. १ लाख ८० हजारांच्या वर विविध प्रकारच्या सहकारी संस्था सहकार कायद्यानुसार नोंदणीकृत असून, या सर्वांचा आर्थिक व्यवहार हा महाराष्ट्र राज्य सरकारच्या एकूण आर्थिक कारभारापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. सरकारची तिजोरी व सहकारी संस्थांची तिजोरी याची तुलना केली असता सहकारी संस्थांची तिजोरी अधिक आहे. परंतु ज्या सहकारावर आधारित व प्रामुख्याने सहकाराच्या जिवावर राज्याचा गाडा चालविला जातो, त्यामध्ये त्या सहकारी संस्थांवर सरकारने वारंवार इंग्रजांच्या सत्तेस लाजवील अशा पध्दतीने अन्यायकारक निर्णय घेवून सर्वसामान्यांना आर्थिक कोंडीत पकडले आहे. ९९ टक्के जनता निमूटपणे हा आर्थिक अत्याचार सहन करीत आहे. परंतु प्रत्येक गोष्टीला अंत हा असतोच.

राज्यात २७,००० च्यावर पतसंस्था असून पस्तीस हजार कोटी रूपयांपेक्षा जास्त ठेवी सर्वसामान्य जनतेच्या या पतसंस्थांमध्ये आहेत. छोट्या माणसांनी उभी केलेली ही पतसंस्थांची चळवळ राज्यामध्ये इतर कोणत्याही सहकारी चळवळीपेक्षा जनतेच्या हृदयात जाऊन बसलेली आहे. सर्वसामान्यांना आपल्यासारखे वाटेल, आपल्यासाठी काम करीत असेल, अशीच ही पतसंस्थांची चळवळ राज्याच्या अनेक खेड्यापाड्यात, प्रत्येक गल्लीगल्लीत पोहोचली आहे. सर्वसामान्य माणसाला पतसंस्थांची ही चळवळ आपली वाटते. या पतसंस्थांमध्ये आर्थिक व्यवहार करण्यासाठी व आपला आर्थिक व्यवहार सहजरित्या विचारपूस करण्यासाठी जवळची चळवळ म्हणजेच पतसंस्थांची चळवळ असे चित्र राज्यभर उभे आहे.

उलटपक्षी राज्यात १६९ सहकारी साखर कारखाने व त्यामध्ये लाखो शेतकरी व ऊस उत्पादक त्यांचे सभासद आहेत. **परंतु जो सभासद शेतकरी साखर कारखान्याचा मालक असतो, तोच सभासद शेतकरी तथाकथित स्वत:च्या मालकीच्या कारखान्यावर मोर्चे काढतो, रस्ते अडवितो, आंदोलने करतो, आवाज उठवितो हे भिषण चित्र राज्यभर पसरलेले दिसते.** आणि संविधानाची खरी चेष्टा या साखर कारखानदारीत

झाल्याचे दिसते.

राज्यातील २७००० पतसंस्थांपैकी ४०० ते ४५० पतसंस्थांमध्ये मुदतपुर्व ठेवी किंवा मुदती पूर्वीच्या ठेवी सभासदांना परत देण्यात, अडचणी आलेल्या आहेत. अशा पतसंस्थांच्या संचालकांवर या मायबाप सरकारने ठेवी परत न दिल्यामुळे फौजदारी गुन्हे दाखल करून अनेकांना तुरूंगात डांबले आहे. परंतु या ठेवींची रक्कम एकूण **पस्तीस हजार** कोटी ठेवींपैकी २०० कोटी रूपये सुध्दा नाही. **परंतु राज्यातल्या केवळ १६९ साखर कारखान्यांमध्ये २०००कोटी रूपयांपेक्षा जास्त ऊस उत्पादकांच्या ठेवींच्या रकमा १५ वर्षे मुदत संपूनही या कारखान्यांनी शेतकऱ्यांना परत दिल्या नाहीत.** शिवाय या ठेवींच्या रकमा शेतकऱ्यांनी स्वखुशी व कोणताही ठेवी ठेवण्याचा लेखी अर्ज सादर न करता **कारखानदारांनी ऊस बिलातून ठेवींची परस्पर कपात केली आहे. अत्यंत भिषण असे हे दुष्टचक्र राज्यसरकारला, साखर आयुक्तांना, नाबार्डला शासकिय लेखा परिक्षकांना दिसायला तयार नाही.** दोनशे कोटी रूपयांच्या ठेवी परत न देणारे पतसंस्थांचे संचालक तुरूंगामध्ये तर दोन हजार कोटींच्या ठेवी वर्षानुवर्षे परत न देणारे या कारखान्यांच्या संचालकांपैकी या कारणास्तव एकालाही तुरूंगात पाठविले नाही. आणि हेच कटु, भिषण व इंग्रजांना लाजविणारे कृत्य या एकाच उदाहरणामध्ये स्पष्टपणे दिसून येते आहे.

पतसंस्थांना कर्जमाफी योजनेत या क्षणापर्यंत समाविष्ट करून घेतलेले नाही. आपापल्या परिने लोकांना नेहमीप्रमाणे फसविण्यासाठी जाहिर सभांमधून संबंधीत मंडळी पतसंस्थांना कर्जमाफी योजना लागू आहे. असे सांगतात. काहीजण केंद्राकडे प्रस्ताव पाठविला आहे, असे सांगतात. तर काहीजण ही कर्जमाफी मिळणार आहे, असे सांगतात. कोठेही संविधानाला धरून एकवाक्यता नाही. जो तो वाट्टेल ते बोलतो, तेही बिनधास्तपणे बोलतो. राज्यातील जनता मुर्ख आहे, असे गृहीत धरून काहीही, कोठेही, कसेही बोलण्याचे धाडस दुर्दैवाने नियमीतपणे चालू आहे.

पतसंस्थांमधील ज्या कार्यकर्त्यांना पतसंस्थेची निवडणूक लढवायची असेल तर त्यांनी वैयक्तिक हजारो रूपये ठेव म्हणून ठेवली पाहिजे अन्यथा त्याला निवडणूक लढविता येणार नाही, असे कायदा हातात घेवून मायबाप सरकारने इंग्रजांना लाजवेल असे परिपत्रक काढले आहे. **आमदार, खासदार निवडणूक लढवितांना त्या उमेदवारांना किती कोटी रूपयांची ठेव ठेवली आहे, असा प्रश्न या राज्यातील पतसंस्थातील कार्यकर्ते विचालीत करीत आहेत.**

सहकार कायद्यात संचालक होण्यासाठीची पात्रता यामध्ये **ठेव** ठेवण्याची कोठेही शब्दरचना अंतर्भूत नाही. महंमद तघलखासारखे फतवे काढणे व ज्यावेळी कोर्टातून आदेश येईल त्याचवेळी ते मागे घेणे ही कामाची पध्दत सर्वसामान्य जनतेला आणखीच आर्थिक दुर्बल करीत आहे.

पतसंस्थांचा मॉडेल बायलॉज मध्ये ठेवींवर ११ टक्के व्याजदर व कर्जावर १५ टक्के व्याजदर अंतर्भूत आहे. म्हणजेच ४ टक्क्याचे मार्जीन (दुरावा) यात अभिप्रेत आहे. परंतु जिल्हा मध्यवर्ती बँकांचे कर्जावरील

व्याजदर वाढल्यामुळे पतसंस्थांना ३ टक्के सुध्दा मार्जीन (दुरावा)शिल्लक रहात नाही. आणि या प्रकरणी सुध्दा मॉडेल बायलॉजमध्ये दुरूस्ती होण्यास तयार नाही. केवळ सर्वसामान्य माणूस हा आर्थिकदृष्टया रोज कमकुवत व्हायला पाहिजे हे सुत्र एकंदरीत अवलंबिल्याचे चित्र रोज जाणवते आहे.

पतसंस्थांतील कर्ज बुडविण्याऱ्यांच्या या राज्यात संस्था निघू लागल्या आहेत. परंतु वाटप केलेले व थकित झालेले कर्ज वसुल करण्यासाठी राज्यात पोलिस कोठेही पतसंस्थांना नियमाप्रमाणे सुध्दा संरक्षण देण्यास तयार नाहीत. याचाच अर्थ असा होतो की, ठेवी परत दिल्या नाही तर तुरूंगात टाकायचे, परंतु याच ठेवीच्या रकमा ज्यांना कर्जापोटी वाटल्या व त्या थकित झाल्या, त्या थकबाकीची वसुली करण्यासाठी मात्र कायद्याप्रमाणे पोलिस संरक्षण द्यायचे नाही, ही बाब मात्र पापी व जुलमी लोकच करू शकतात हे आता उघड झालेले आहे.

छत्रपती शिवरायांच्या या राज्यात शाहू, आंबेडकर व ज्योतीबा फुले ह्यांच्या या कर्मभूमित सर्व सामान्य माणसाला आर्थिकदृष्ट्या कसे नाडले जात आहे याचे उग्र स्वरुप दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. सर्वांना पॅकेजेस दिली जातात. परंतू पतसंस्थांसाठी मात्र पॅकेज देण्याचा साधा विचारसुध्दा करायला कोणीही तयार नाहीत, यातच सर्व काही आले आहे.

२७००० च्या वर पतसंस्था, या पतसंस्थामध्ये काम करणारे लाखो कार्यकर्ते संचालक,७ लाखापेक्षा जास्त काम करणारे कर्मचारी वर्ग व पतसंस्थांचे करोडो सभासद  ही दंडेलशाही, सोयीनुसार कायद्याचा वापर करण्याची प्रवृत्ती व छोट्या माणसाला आर्थिकदृष्ट्या नाडण्याची प्रवृत्ती किती दिवस सहन करणार? म्हणून आम्ही सुरुवातीलाच म्हटले आहे की, मदमस्त लोकांचा , अन्याय करणाऱ्यांचा, लोकांना मुर्ख समजणाऱ्यांचा व प्रामुख्याने लोकांची भरदिवसा आर्थिक लुट करणाऱ्यांचा शेवट होतोच. परंतू सत्तेतून मिळवलेल्या पैशात एवढी गुर्मी आहे की, सत्ता गेली तर बेहत्तर. परंतू लोकांना आम्ही लुटणारच, अशी ज्यांची मानसिकता आहे, त्यांचे परमेश्वरसुध्दा कसे रक्षण करील ? सत्ता आणि पैसा किंवा केवळ पैसा हे येथूनपुढे जिरवता येणार नाही. **सर्वांची सर्वप्रकरणे जगजाहिर होवून सत्तेतून कमविलेला पैसा यावर टाच आल्याशिवाय रहाणार नाही** व तुरुंगात खडी फोडल्याशिवाय पर्याय राहणार नाही. अशाप्रकारच्या परिस्थितीची भविष्यकाळ वाट पहात आहे, हे शोषणकर्त्यांनी लक्षात घ्यावे.

**जयहिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**